# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 31 मे 2020, दि. 26 जून 2020, दि. 29 जून 2020, दि. 02 ऑगस्ट 2020, दि. 01 सप्टेंबर 2020, 01 ऑक्टोबर 2020, दि. 27 ऑक्टोबर 2020, दि. 02 नोव्हेंबर 2020, दि. 05 नोव्हेंबर 2020, 15 नोव्हेंबर 2020.
5. महाराष्ट्र शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण 2020/प्र.क्र. 140/एसडी-6 दि. 10 नोव्हेंबर 2020.
6. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण 2020/प्र.क्र. 140/एसडी-6 दि. 17 नोव्हेंबर 2020.
7. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जि. प. उस्मानाबाद यांचे पत्र जा.क्र. जिपऊ/शिक्षण/मावि-6/1125/2020 दि. 17 नोव्हेंबर 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 21 / 11 /2020.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 अन्वये राज्यातील इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु करण्यास मान्यता दिलेली असून त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. ज्याअर्थी इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु करताना संदर्भ क्र. 5 मध्ये नमूद करण्यात आलेल्या स्थानिक प्रशासनाच्या जबाबदा-यांचे व मार्गदर्शक सूचनां (SOP) चे पालन करणेबाबत संदर्भ क्र. 6 अन्वये सूचित केले आहे.

ज्याअर्थी निवासी वसतिगृह, आश्रमशाळा याठिकाणी विद्यार्थ्यांकडून कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक नियमांचे पालन, सामाजिक अंतराचे पालन होत नसल्याने कोविड-19 चा प्रादुर्भाव होऊ नये याकरिता उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु करताना निवासी वसतिगृह, आश्रमशाळा सुरु करण्यास सद्यस्थितीमध्ये परवानगी देता येणार नाही.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने "MISSION BEGIN AGAIN" अंतर्गत वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार या कार्यालयाने संदर्भ क्र. 4 मध्ये नमूद आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये कंटेन्मेन्ट झोन (Containment Zone) च्या बाहेरील क्षेत्रामध्ये ठराविक उपक्रम/बाबी पुन्हा चालू करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. यामध्ये बाजारपेठ, दुकाने, एस. टी. बसेस, धार्मिक स्थळे व प्रार्थनास्थळे, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स इ. चा समावेश आहे. तसेच व्यक्तींच्या आंतरजिल्हा व आंतरराज्य



Scanned by CamScanner

प्रवासासही परवानगी देण्यात आलेली असून या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केल्यानुसार जिल्ह्यातील इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि या सर्व बाबी/उपक्रम पुन्हा चालू करताना कोविड-19 चा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कोविड-19 च्या सर्व प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करणे, गर्दी न करणे व सामाजिक अंतराचे पालन करणे, मास्क चा वापर करणे अनिवार्य आहे. तसेच सर्दी, खोकला, ताप, श्वसनास त्रास होणे, डोकेदुखी इ. कोविड-19 ची लक्षणे आढळून आल्यास आजार न लपविता तात्काळ वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संदर्भ क्र. 4, 5, 6 व 7 चे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

1. उस्मानाबाद जिल्ह्यातील ज्या शाळांमध्ये विद्यार्थी त्यांचे स्वत:चे घरुन येणे-जाणे करतात अशा शाळांमधील इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु करण्यात यावेत तथापि निवासी वसतिगृह, आश्रमशाळा चालू करण्यात येऊ नयेत. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील इयत्ता 9 वी ते इयत्ता 12 वी चे वर्ग दिनांक 23 नोव्हेंबर 2020 पासून सुरु करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्र. 5 व 7 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक शाळेमध्ये Thermometer, Thermal Scanner/Gun, Pulse Oxymeter, जंतूनाशक, साबण, पाणी यांचा वापर करणे तसेच संदर्भ क्र. 5 व 7 मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे (SOP) चे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य राहील. (ज्या संस्थांना आपल्या निवासी शाळा सुरु करावयाच्या आहेत त्यांनी अनिवासी शाळेप्रमाणे केवळ वर्ग भरवावेत. हॉस्टेल व इतर राहण्याच्या सुविधा सुरु करता येणार नाहीत. अशा परिस्थितीत पुढील सूचना येईपर्यंत ऑनलाईन सुविधा पुरविणे उचित राहील.)

2. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये कोविड-19 चे अनुषंगाने जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद व जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालये, कोविड केअर सेंटर्स (CCC) याठिकाणी RTPCR चाचणी व RAPID ANTIGEN TEST ची व्यवस्था उपलब्ध असून जिल्ह्यातील नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप, श्वसनास त्रास होणे, डोकेदुखी इ. कोविड-19 ची लक्षणे आढळून आल्यास आजार न लपविता तात्काळ वरिल नमूद ठिकाणी जाऊन कोविड-19 ची तपासणी करावी.

3. शाळा सुरु करण्यात आल्या तरी पालकांवर विद्यार्थ्यांना शाळेत पाठवण्याची सक्ती करु नये. गर्दी न होऊ देता समुपदेशन आयोजित करुन घरी कोणता अभ्यासक्रम स्वयंअध्ययनाने पूर्ण करता येऊ शकतो याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी विषयनिहाय स्वयंअध्ययन शक्य असलेला अभ्यासक्रमातील भाग याची सूची बनवून इयत्ता व विषयनिहाय पालकांना देता येईल असा प्रयत्न करावा.

4. नागरिकांना सूचित करण्यात येते की, कोविड-19 संसर्गाची दुसरी लाट येण्याची शक्यता असून मास्कचा वापर न केल्याने व सामाजिक अंतराचे (सोशल डिस्टंन्सींग) पालन न केल्याने परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे कोविड-19 बाबत शासन निर्देशांचे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करावे.

21/11

(कौस्तुभ दिवेगावकर)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner

प्रत:- 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), जि. प. उस्मानाबाद.
8. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
9. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
10. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
11. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
13. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
14. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
16. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
17. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**



Scanned by CamScanner